महाराष्ट्र शासन

# जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण पालघर, जिल्हा पालघर यांचे कार्यालय

पार्श्वनाथ ९ इमारत, बिडको नाका, नवली, ता.पालघर, जिल्हा-पालघर

दुरध्वनी क्रमांक ०२५२५-२५३१११ Email ID : rdc.palghar-mh@gov.in

---

संदर्भ :-

१) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५.

२) दिनांक १७/०५/२०२१ पासून पालघर जिल्हयातील किनारपट्टीस धडकलेले **तौक्ते** चक्रीवादळ.

३) या कार्यालयाचे आदेश क्र.जि.आ.व्य.पालघर/तौत्के चक्रीवादळ/आदेश/कावि-४४४/२१ दि.१८/०५/२०२१

---

क्र.जि.आ.व्य.पालघर/तौक्ते चक्रीवादळ-मुदतवाढ आदेश/कावि-४५७/२१ दि.२१/०५/२०२१

## आदेश

ज्याअर्थी, अरबी समुद्रात निर्माण झालेल्या "**तौक्ते**" या चक्रीवादळामुळे पालघर जिल्हयात दिनांक १७/०५/२०२१ रोजी अतिमुसळधार पाऊस पडलेला आहे. सदरच्या चक्रीवादळाच्या प्रभावाने जिल्हयात घर, गोठे, शेड, झाडे, विद्युत खांब, सार्वजनिक इमारती इ. चे छत उडून जाणे, तुटणे व इतर अनुषंगिक बाबींचे मोठया प्रमाणात नुकसान झालेले आहे. "**तौक्ते** " या चक्रीवादळाचा ओघ कमी झाल्यावर वरील बाबींची दुरुस्ती होणे आवश्यक आहे. त्याकरिता सदर दुरुस्ती कामी आवश्यक साहित्य उपलब्ध होणारे दुकाने उपोद्घातातील अ.क्र.३ अन्वये दिनांक २१/०५/२०२१ रोजी रात्री ०८.०० वाजेपर्यंत सुरु ठेवण्यास परवानगी देण्यात आलेली असून सदर कालावधी वाढविणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी **डॉ माणिक गुरसळ, जिल्हाधिकारी पालघर तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पालघर** मला आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारान्वये **पालघर जिल्हयातील इलेक्ट्रीकल व हार्डवेअरची दुकाने व ज्या दुकांनामध्ये ताडपत्री, खिळे, प्लॅस्टिक कागद, बांबु, कुऱ्हाड, विद्युत उपकरणे तसेच वरील बाबी दुरुस्ती कामी आवश्यक साहित्य असणारी इतर अनुषंगिक दुकाने सुरु ठेवण्याकरिता उपोद्घातातील अ.क्र.३ आदेशास मुदतवाढ म्हणून दिनांक २५/०५/२०२१ रोजी रात्री ०८.०० वाजेपर्यंत सुरु ठेवण्यास परवानगी देण्यात येत आहे. तसेच सदर कालावधीत "वेल्डींग दुकाने" सुरु ठेवण्यास परवानगी देण्यात येत आहे.**

सदरचा आदेश आज दि.२१/०५/२०२१ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला असे.

**सही/-xxx**
(डॉ माणिक गुरसळ)
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन**
**प्राधिकरण, पालघर**

**प्रत:-**

१) मा.विभागीय आयुक्त, कोंकण विभाग यांना माहितीस्तव सविनय सादर.

२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. पालघर यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाही.

३) आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाही.

४) पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर-वसई-विरार आयुक्तालय यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाही.

५) पोलीस अधीक्षक पालघर यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाही.

६) उपविभागीय अधिकारी (सर्व) ................. जि. पालघर यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीकरिता.

७) जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी पालघर यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीकरिता.

८) जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था पालघर यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीकरिता.

९) तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी (सर्व)................. जि. पालघर यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीकरिता.

१०) गट विकास अधिकारी, पं.स. (सर्व) ................. जि. पालघर यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाही व ग्रामपंचायत स्तरावर प्रसिध्दीकरिता.

११) मुख्याधिकारी, नगर परिषद/नगर पंचायत (सर्व) ................. जि. पालघर यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाही व प्रसिध्दीकरिता.

१२) जिल्हा माहिती अधिकारी पालघर यांना माहिती तथा प्रसिध्दीकरीता.

(स्थळ प्रतीवर मा.जिल्हादंडाधिकारी यांची स्वाक्षरी असे)

जिल्हाधिकारी पालघर
जिल्हा पालघर

(डॉ.किरण महाजन)

**निवासी उप जिल्हाधिकारी तथा**
**मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा आपत्ती**
**व्यवस्थापन प्राधिकरण, पालघर**